# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

**(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)**

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५
दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३११७ email:-establishment.section@unigug.ac.in


जा.क्र. गो.वि./आस्था./२०२६/२०२३ दि. २७/०७/२०२३

## *परिपत्रक*

**संदर्भः-** मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपुर यांचे पत्र दिनांक २६/०७/२०२३

विद्यापीठाशी संलग्नित चंद्रपुर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते की, चंद्रपुर जिल्ह्यात भारतीय हवामान खात्याच्या वर्तवलेल्या अंदाजानुसार दिनांक २७/०७/२०२३ रोजी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असून, अतिवृष्टीमुळे कोणत्याही प्रकारची अनुसुचित घटना घडू नये यादृष्टीने संदर्भांकित पत्रान्वये मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपुर यांनी चंद्रपुर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांना दिनांक २७/०७/२०२३ रोजी सुट्टी जाहिर केलेली आहे.

सदर सुट्टी विद्यापीठाशी संलग्नित चंद्रपुर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांना व चंद्रपुर येथील विद्यापीठाव्दारे सुरू असलेले विद्यार्थी सुविधा केंद्रास सुध्दा लागू राहील याची नोंद घ्यावी.

**(डॉ. अनिल हिरेखण)**
**कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

***प्रतिलिपी माहितीकरीता सादरः-***

१. *मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.*
२. *मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.*
३. *मा. प्राचार्य, चंद्रपुर जिल्ह्यातील सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली*
४. *सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.*
५. *विद्यार्थी सुविधा केंद्र, चंद्रपुर, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.*

**वाचले** :- १. प्रादेशिक हवामान केंद्र, भारतीय हवामान खाते, नागपूर यांचा दिनांक २६/०७/२०२३ चा हवामान ईशारा.
२.आपत्ती व्यवस्थापन अधिनियम,२००५

क्र/कावि/मह.सहा/नै.आ/ २०५ /२०२३
जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय
दिनांक - २६/०७/२०२३

आदेश : -

**ज्याअर्थी** चंद्रपूर जिल्ह्यात जुलै महिन्यात यापुर्वी अनेक तालुक्यात अतिवृष्टी होऊन अनेक रस्ते पाण्याखाली गेल्याने व अनेक गांवाना पुराचा वेढा पडल्याने जनजिवन विस्कळित होण्याच्या घटना घडल्या आहेत. भारतीय हवामान खात्याच्या वर्तवलेल्या अंदाजानुसार दिनांक २७/०७/२०२३ रोजी चंद्रपूर जिल्ह्यात अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे.

**आणि ज्याअर्थी** चंद्रपूर जिल्हयात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये तसेच अतिवृष्टीमुळे आपतकालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा परिणाम शालेय विद्यार्थ्यांवर होऊ नये या करिता चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्या, पुर्व प्राथमिक व प्राथमिक शाळा, विद्यालये व महाविद्यालये यांना दिनांक २७/०७/२०२३ रोजी सुट्टी असणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झाली आहे.

**त्याअर्थी,** मी विनय गौडा जी सी, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर, मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ३० (२)(५) व (१८) नुसार प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, **चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्या, पुर्व प्राथमिक व प्राथमिक शाळा, विद्यालये व महाविद्यालये यांना दिनांक २७/०७/२०२३ रोजी सुट्टी जाहिर करीत आहे. मात्र, इयत्ता दहावी व बारावी पुरवणी परिक्षा वेळापत्रकानुसार सुरु राहतील आणि सर्व निवासी शाळा नियमितपणे सुरु राहतील.**

तरी नागरीकांनी भारतीय हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार सतर्क राहून आवश्यक खबरदारी घ्यावी व आपतकालीन परिस्थितीत खालील दिलेल्या ठिकाणी संपर्क साधावा.

१. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर
संपर्क क्र. ०७१७२ २५१५९७ / ०७१७२ २७२४८०

(विनय गौडा जी सी)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
चंद्रपूर

प्रतिलिपी : १. मा. विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर

२. मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन केंद्र मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव.

३. पोलिस अधिक्षक, चंद्रपूर

४. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात यावे.

५. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद चंद्रपूर यांना माहिती व उचित कार्यवाही करीता.

६. शिक्षणाधिकारी, प्राथमिक/माध्यमिक जिल्हा परिषद चंद्रपूर यांना सुचित करण्यात येते की आपल्या अधिनस्त सर्व शाळांना सुचना देण्यात यावी.

७. शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, चंद्रपूर यांना सुचित करण्यात येते की आपल्या अधिनस्त सर्व शाळांना सुचना देण्यात यावी.

८. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी जि.प.चंद्रपूर

९. संचालक आकाशवाणी केंद्र चंद्रपूर यांनी आपल्या स्तरावरून प्रसिध्दी द्यावी.

१०. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर यांना उचित कार्यवाही करिता अग्रेषित.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
चंद्रपूर